राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ ७२६/२०२४ /पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| प्रभाकर आबाजी कुलकर्णी | प्रशासन अधिकारी<br>शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे १ | शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)<br>शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे |

**<u>व्दितीय अपील सुनावणी दिनांक- ०६/०६/२०२४</u>**

अपिलार्थी यांनी दि. २९.०१.२०२४ रोजी राज्य माहिती आयुक्त,खंडपीठ पुणे यांचे कडे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले. अर्जदाराने व्दितीय अपिल दाखल करताना 'माहिती दिली नाही' असे प्रयोजन नमूद केले.

आयोजित सुनावणीस अपिलार्थी, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी हजर आहेत.

१. अपिलार्थीचा माहिती अर्ज दि. २७.०९.२०२३ रोजीचा आहे. त्यानुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक गट-क श्री. किशोर भावसार यांनी दि. ३१.१०.२०२३ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले.
२. अपिलार्थीचे प्रथम अपिल दि. २०.११.२०२३ रोजीचे असुन त्यावर तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) म.रा.पुणे यांनी सुनावणी घेऊन दि. २९.१२.२०२३ रोजी आदेश पारित केला असून त्यामध्ये श्री. कुलकर्णी यांनी सादर केलेल्या तक्रारीस अनुसरुन संचालनालयाने सहसंचालक सोलापूर यांना अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदर पत्राची प्रत अपिलार्थी यांना देण्यात आली आहे. तसेच सुनावणीचे वेळी प्रथम अपिलीय अधिकारी सहसंचालक यांना अपिलार्थी यांचे समक्ष दूरध्वनी करुन सदर वस्तूनिष्ठ अहवाल १५ दिवसात संचालनालयास सादर करणे बाबत कळविले .
३. सुनावणीचेवेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे कथन केले की, अपिल आदेशानंतर कुठलीही माहिती मिळाली नाही.
४. आयोगाकडील उपलब्ध अभिलेखावरुन असे दिसून येते की, माहिती अर्जामध्ये अपिलार्थीने दि.२७.०९.२०२३ रोजी जे पत्र दिले आहे त्याबाबत माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर करताना अपिलार्थीच्या अर्जाच्या अनुषंगाने या संचालनालयाने विभागीय सहसंचालक सोलापूर यांना कळविण्यात आले आहे. संचालनालयाची दि. ०६.१०.२०२३ चे पत्राची प्रत उत्तर सोबत जोडली असे नमूद केले आहे. सदर उत्तरावरुन स्पष्ट होत नाही की दि. २७.०९.२०२३ चे अर्जावर काय कार्यवाही केली. जन माहिती अधिकारी यांनी उत्तरामध्ये माहिती बाबत व्यवस्थितपणे नमूद न करता जाणूनबुजून चुकीचे उत्तर दिले हे स्पष्ट होते. अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अपिलीय आदेशामध्ये जन माहिती अधिकारी यांना आदेश न देता प्रशासकीय कारवाई बद्दल नमूद करुन अपिलीय अर्ज निकाली काढला आहे. अपिलीय अधिकारी यांनी नियमाप्रमाणे कार्यवाही केली नाही.

५. तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जावर चूकीचे उत्तर देऊन शासकीय कामामध्ये निष्काळजीपणा केलेले आहे, त्यांमुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

६. तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील आदेश पारीत करताना जन माहिती अधिकारी यांना आदेश न देता प्रशासकीय कारवाई बद्दल नमूद करुन नियमबाहय कार्यवाही केली त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम १९(६) चा भंग केलेला असल्याने ते शिस्तभंग विषयक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(२) नुसार शिक्षण संचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने कार्यवाहीची स्पष्टपणे माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस संबंधित प्राधिकरणाकडून माहिती प्राप्त करून घेऊन नोंदणीकृत टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी चूकीचे उत्तर देऊन शासकीय कामामध्ये निष्काळजीपणा केलेले आहे, त्यामुळे अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(१) नुसार कारवाई का करणेत येवू नये? याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

३. तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) म.रा.पुणे यांनी प्रथम अपील आदेश पारीत करताना जन माहिती अधिकारी यांना आदेश न देता प्रशासकीय कारवाई बद्यल नमूद करुन नियमबाहय कार्यवाही केली, त्यामुळे अधिनियमाच्या कलम 7(1) चा भंग केलेला असलेने त्यांचेविरूध्द अधिनियमाच्या कलम २०(२)नुसार कारवाई का करणेत येवू नये? याबाबतचा खुलासा आयोग आदेश प्राप्ती पासून एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा, अन्यथा आयोगाच्या आदेशाच्या उल्लंघनाची कृती दंडात्मक कारवाईस पात्र ठरेल.

या निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र सत्यमेव जयते पुणे खंडपीठ

( समीर सहाय )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ ७२६/२०२४ /पुणे /5748/2024 दिनांक -14/10/2024

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाही साठी अग्रेषित-</u>